नियमित फौजदारी खटला नं.३८१/२०२४
निशाणी- २३

<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ चा जबाब.</u>

मी शपथेवर कथन करतो की,

| | |
|---|---|
| माझे नांवः- | रविंद्र सुरेश दायमा |
| वयः- | ३३वर्षे, धंदाः- खाजगी नोकरी |
| राहणारः- | संदिप नगर सारस नगर, अहिल्यानगर |

<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती सीमा शेख यांचेकडूनः-</u>

१. दि. २१/०५/२०२३ रोजी मी आणि माझी पत्नी सुमन बसने दुपारी १२.०० वा.च्या सुमारास पुण्याला चाललो होतो. तारकपुर बस स्टॅण्डवर बस येण्यासाठी थांबलो होतो. तेव्हा छ.संभाजी नगर ते महाड बस आली त्या बसच्या मागच्या सिटवर आम्ही जाऊन बसलो. त्यावेळेस आमच्या पुढच्या सीटवर बसलेल्या एका महिलेने तिचे पर्समधील पैसे चोरीला गेले असे सांगितले. त्यावेळेस माझ्या पत्नीने सुध्दा तिची पर्स तपसाली असता त्यामधुन रोख १५,०००/- चोरीला गेल्याचे समजले. आम्ही सगळीकडे पाहिले असता मिळुन न आल्याने तोफखाना पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. मला आता दाखविलेली फिर्याद तीच आहे. त्यावर माझी सही आहे.त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.त्यास <u>नि. २४</u> देण्यात येते. एफआयआरवर माझी सही आहे. त्यास <u>नि. २५</u> देण्यात येते. त्यानंतर दि. २०/१२/२०२३ रोजी पोलिसांनी मला बोलाविले होते. त्यांनी मला माझी अर्धी रक्कम मिळाल्याचे व आरोपी मिळुन आल्याचे सांगितले. त्यांनी आरोपीचे नावे छाया भोसले, जमुना काळे व शितल भोसले असे सांगितले. मी आरोपींना ओळखु शकतो. आरोपी क्र. १ आज न्यायालयात हजर आहे. मी तिला ओळखतो.

<u>उलट तपास आरोपी क्र. १ तर्फे विधिज्ञ श्री. बी. एम. झगडे यांचेकडूनः-</u>

२. मी दुपारी १२.०० वा. च्या दरम्यान तारकपुर बस स्टॅण्डवर आलो. हे म्हणणे खरे आहे की, तेथे खुप गर्दी होती. हे म्हणणे खरे आहे की, मी बसमध्ये जागा मिळण्यासाठी आतमध्ये घुसलो व मागच्या सीटवर जाऊन बसलो. हे म्हणणे खरे

नाही की, माझी पत्नी बसच्या खाली होती. हे म्हणणे खरे नाही की, पैसे कुठे गहाळ झाले हे मला वैयक्तीक माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी आम्हाला आरोपींना दाखविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी छाया भोसले हिला ओळखत असल्याचे पोलिसांच्या सांगण्यावरुन खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, चोरीला गेलेले पैसे मला आज पर्यत पोलिसांनी दाखविले नाहीत.

उलट तपास आरोपी क्र. २ व ३ तर्फे विधिज्ञ श्री. हानिफ शेख यांचेकडून:-

३. माझ्या चोरी गेलेल्या पैशामध्ये पैशावर ओळखीची खुण नव्हती. पोलिसांनी माझ्या समक्ष आरोपींची ओळख परेड घेतली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे कुठले पैसे चोरीला गेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी विरुध्द खोटी केस दाखल केली आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष,

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN

Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2025.10.13 15:27:55 +0530

(एल.एस.पाढेण)
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.

दि.१३/१०/२०२५.